# ।। हीण लछ को अंग ।।
## मारवाडी + मराठी
✻

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

## ।। अथ हीण लछ को अंग लिखंते ।।

।। कवित्त ।।

हरि बेमुख सो शुद्र ।। शुद्र मुख राम न बोले ।।
घट तो दे सो शुद्र ।। शुद्र पूरो नहिं तोले ।।१।।

ज्या मनुष्यात शुद्र लक्षण आहेत,रामजीशी गर्भात रामनाम घेण्याचा करार केला आणि गर्भातून बाहेर आल्यानंतर रामनाम घेतले नाही,तो एक नंबरचा नीच आहे,जो तोंडाने रामनाम उच्चारण करीत नाही,तो नीच आहे,जो कोणी वस्तू मोजून देतांना कमी मोजून देतो तो नीच आहे,जो तोलून देण्यात पुर्ण मोजत नाही,तो मनुष्य नीच स्वभावाचा आहे. ।।१।।

परणी त्यागे शुद्र ।। शुद्र अवरा संग जावे ।।
कड़वो बोले शुद्र ।। शुद्र कै दुख मनावे ।।२।।

जो आपल्या लग्न केलेल्या स्त्रीला सोडतो,तो नीच आहे.जो दुसऱ्या परक्या स्त्रीशी भोग करतो,तो नीच आहे.तोंडाने कटु वचन बोलतो तो नीच आहे.दुसऱ्यांना बोलून दुसऱ्यांना दु:खी करून देतो तो नीच आहे. ।।२।।

बोहो अहंकारी शुद्र ।। शुद्र बोहो तामस होई ।।
लछ खोटा सो शुद्र ।। शुद्र करणी नहिं कोई ।।३।।

खुपच अहंकारी आहे तो नीच स्वभावाचा मनुष्य नीच आहे,ही करणी काही नीच नाही, जिचे लक्षण नीच आहे ते नीच आहे,ज्यांचे लक्षण नीच आहे तो नीचच आहे,आपला कुळाचा धंदा करणारा नीच नाही आहे,नीच तर त्याच्या आतील स्वभाव आणि लक्षणाचे कारण असते.आपला धंदा केल्याने होत नाही. ।।३।।

बोहो तिसना सो शुद्र ।। शुद्र कूं चाय नचावे ।।
झूठ साच मिल शुद्र ।। शुद्र बोहो बाध चलावे ।।४।।

जसे खुपच तृष्णा आहे ते नीच आहे.ज्या मनुष्यांला चाहत नाचवते तो नीच आहे, खोट्या गोष्टीला खऱ्या गोष्टीत मिळवतो ते नीच आहे.पुष्कळ वादविवाद करतो तो नीच आहे. ।।४।।

पिवे तमाखु शुद्र ।। हिणआफु बोहो खावे ।।
सुरे पिये सो शुद्र ।। शुद्र अेमख मंगावे ।।५।।

जो तमाखु(चिलीम पितो)त्याला नीच जातीचा जाणा.अफू खातो त्याला नीच जातीचा जाणा.दारू पितो तो नीच आहे.जे मांस खातात ते नीच आहेत. ।।५।।

परणी छोडे शुद्र ।। शुद्र मरजाद न माने ।।
मिलीयां मिनषा जाय ।। शुद्र मुख कडवी ठाने ।।६।।

जो विवाहीता पत्नीला सोडून मायावी साधू होवून जातो तो नीच आहे.जो केवली साधु संताची किंवा मोठे म्हातान्यांची मर्यादा ठेवीत नाही तो नीच आहे,मनुष्यांना जाऊन भेटतात आणि तोंडाने कड्वे वचन बोलतात ते नीच आहे.।।६।।

**राम न के मुख शुद्र ।। शुद्र झाड़ा बोहो सिखे ।।**
**पित्तर भूत अराध ।। शुद्र सो घर घर भीखे ।।७।।**

जो तोंडाने राम नाही म्हणत तो नीच आहे.जो जादूटोणा मंत्र इ.शिकतो तो नीच आहे. पितरांची तसेच भुताची आराधना करतात ते नीच आहे.घरात घरात भीक मांगतात ते नीच आहे. ।।७।।

**न्याव करण मे शुद्र ।। शुद्र पखो सो राखे ।।**
**साच झूठ कर देत ।। झूठ साचो कर राखे ।।८।।**

जो न्याय करतांना निरपक्ष न्याय न करता(एकाचा)पक्ष घेऊन न्याय करतो तो नीच आहे.न्याय करण्यात खोट्याचे खरे आणि खऱ्याचे खोटे करून देतो तो नीच आहे. ।।८।।

**हरि बेमुख सो शुद्र ।। शुद्र निन्दा बोहो ठाणे ।।**
**चुगली करे सो शुद्र ।। शुद्र सो आन बखाणे ।।९।।**

रामजीशी जो विमुख आहे ते सर्व नीच आहेत.दुसऱ्याची खुप निंदा करतात ते नीच आहे.जे दुसरे बळी चढणारे राक्षसी देवतांची बखाण करतात ते नीच आहे. ।।९।।

**समरथ सिरझणहार ।। ताय को मरम न पावे ।।**
**पाँचा के बस शुद्र ।। शुद्र बिष निस दिन खावे ।।१०।।**

समर्थ शिरजणहाराचे म्हणजे पैदा करणाऱ्याचा मर्म(भेद)ज्याला मिळाला नाही,ते नीच आहे.जे पाची इंद्रियांच्या वश झाले आहे ते नीच आहेत.जे रात्रंदिवस विषय रस खातात ते नीच आहेत. ।।१०।।

**नहि भगत की लेश ।। शुद्र बातां बोहो धर हे ।।**
**घर मे आतम राम ।। ताय की शेव न कर हे ।।११।।**

ज्याला केवली भक्तीचा लवलेश नाही व केवली भक्ती सोडून तो दुसऱ्या भक्तीचा खुपच गोष्टी करतो तो नीच आहे.घरातच म्हणजे आपल्या शरीरात आत्माराम आहे त्याची सेवा जो करीत नाही तो नीच आहे. ।।११।।

**ब्रम्ह न चीने शुद्र ।। शुद्र कर्म बोहोत बखाणे ।।**
**राचे राग विलास ।। नाँव हिरदे नहिं आणे ।।१२।।**

सतस्वरुप ब्रम्ह शोधत नाही तो नीच आहे.तसेच जो त्रिगुणी मायेच्या अनेक प्रकारचे कर्माचे वर्णन करतो,तो नीच आहे.जे राग रागिणी गातात व ऐकण्या करीता रचमच

राहीले आहे तसेच इंद्रियाचे भोग विलास करतात.रामाचे नाव घेण्याचे हृदयात आणीत नाही ते नीच आहे. ।।१२।।

**दगो करे सो शुद्र ।। द्वितिया मन मांहि ।।**
**हरबिन बोले शुद्र ।। शुद्र बेटी को खाहि ।।१३।।**

दुसऱ्याशी जे दगा करतात तो नीच आहे.ज्याच्या मनात दुसऱ्या विषयी विषम भाव आहे ते नीच आहेत,जे हर(रामजी)शिवाय दुसऱ्या गोष्टी बोलतात ते नीच आहे,जे आपल्या मुलीचा पैसा तसेच तिचा घरचे अन्न खातात ते नीच आहे. ।।१३।।

**हित कर बिरचे शुद्र ।। शुद्र फिर बेर चलावे ।।**
**लूण हरामी शुद्र ।। शुद्र मुख राम न गावे ।।१४।।**

दोस्ती करून त्या दोस्ती पासून बदलून जातात आणि त्या दोस्ताशी पुन्हा दुष्मनी करतात ते नीच आहेत.जे नमक हरामी म्हणजे ज्या मालकाचे मीठ खातात,त्या मालकाशी नमक हरामी करतात,ते नीच आहेत.तसेच जे तोंडाने राम नाम गात नाही ते नीच आहे. ।।१४।।

**शुद्र श्याम सुं बेर ।। शुद्र कुळ हाथ चलावे ।।**
**शुद्र मुख नहि राम ।। शुद्र दावा दिन जावे ।।१५।।**

आपल्या मालकाशी दुष्मनी करतात ते नौकर नीच आहे.आपल्या कुळ म्हणजे माता, पिता,पत्नीवर हात चालवतात ते नीच आहे.ज्याच्या मुखात राम नाही ते नीच आहे.ज्याची त्याची तक्रार करण्यात ज्याचा दिवस व्यतीत होतो ते नीच आहे. ।।१५।।

**शुद्र गुरू सो होय ।। राम बिन आन बतावे ।।**
**सिष कूं हुँचे खाय ।। शुद्र गुरू भर्म दिढावे ।।१६।।**

जो गुरू बनुन राम नामाशिवाय,दुसरे बळी घेणारे अन्य देवांची भक्ती करणे दाखवितो तो गुरू नीच आहे.जो आपल्या शिष्याला आपल्या जाळ्यात खेचून कैवल्य भक्तितून काढून भ्रमात टाकून देतात ते गुरू नीच आहेत.।।१६।।

**साचो देवळ छोड़ ।। झूठ की सेव बतावे ।।**
**शुद्र गुरू सुखराम ।। राम बिन भर्म दिढावे ।।१७।।**

खरा म्हणजे सतस्वरुपी देव स्थान सोडून खोटे म्हणजे बळी देणारे देव स्थान सांगतो, तो नीच गुरू आहे,रामनामाचा शिवाय दुसरे भ्रम पकडण्यास सांगतात,ते नीच गुरू आहेत,असे आदि सतगुरू सुखरामजी महाराज बोलले. ।।१७।।

**भाड खाय सो शुद्र ।। शुद्र सो सूंकाँ लेवे ।।**
**करे दलाली शुद्र ।। शुद्र सुख जीव न देवे ।।१८।।**

जो भाड खातो तो नीच आहे,भाड खाणारा अति नीच आहे.जो रिश्वत घेतो तो नीच

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

आहे. दलाली करणे(मुलींची दलाली करणारे कन्या दलाल आणि वेश्यांचे दलाल),हे दलाली करणारे नीच आहेत.आपल्या जीवाला सुख देत नाही,पाठीवर लोखंडाचा साखळी सारख्या वस्तूने मारुन मारुन दु:ख देतो तो नीच आहे.।।१८।।

**मिली साट में शुद्र ।। शुद्र ले भिचकी राळे ।।**
**बन दून्टे सो शुद्र ।। शुद्र सो नगरी वाळे ।।१९।।**

जो लग्न(सगाई)जोडण्यामध्ये अवरोध उत्पन्न करतो,लग्न(सगाई)जोडू देत नाही.तो नीच आहे.वनाला आग लावून देतात,ते नीच आहेत.घराला,गावाला जो आग लावून देतो,तो नीच आहे. ।।१९।।

**सरवर फोडे पाळ ।। शुद्र सो देवळ ढावे ।।**
**बन काटे सो शुद्र ।। रूख सो खोद मंगावे ।।२०।।**

जो सरोवराचे बांध तोडून पाणी काढून देतो आणि बांध तोडल्या कारणाने पुन्हा पाणी नाही थांबत,असा बांध तोडणारा नीच आहे.देवालय पाडून टाकतो तो नीच आहे. वनातील झाड कापतात ते नीच आहेत,झाडांना खोदून खोदून आणतात,(झाड आपल्या हाताने न खोदता,दुसऱ्याकडून खोददतात),तर दुसऱ्याकडून खोदण्याकरीता बोलावणाराही नीच आहे. ।।२०।।

**झूठ साख भरे शुद्र ।। शुद्र सो हिंडण जावे ।।**
**मळ धारी रीझाय ।। शुद्र फूले कुमळावे ।।२१।।**

जो खोटी साक्ष देतो तो नीच आहे.जो बे(उगाच)फालतू देश परदेश फिरायला जातो तो नीच आहे.मळधारी म्हणजे मेद,मजा,मांस,मळ,मुत्र,रूधीर,हाडे याच्याने भरलेले मळधारी मनुष्य आहे,त्यांना रीझवून खुष करतात ते नीच आहेत.मनुष्य जो मळाचा मैला आहे त्याला खुष करून,मनात अती प्रसन्न होतो आणि मनुष्याचा नाराज होवून जाण्याने अती दु:खी होवून चेहरा उतरुन देतो तो नीच आहे. ।।२१।।

**हर बिन बोले बेण ।। शुद्र सो आन मनावे ।।**
**राम नाम बिन साख ।। शुद्र आचार चलावे ।।२२।।**

हर म्हणजे रामजीचा शिवाय दुसरे वचन म्हणजे ज्ञान बोलतो तो नीच आहे.अन्य देवतांना मानतो म्हणजे आराधना,पुजा करतो तो नीच आहे,रामनामा शिवाय दुसरी साखी बोलून आचरण चालवतो,तो नीच आहे. ।।२२।।

**जिवां कूं डेहकाय ।। शुद्र यूं नर्क ले जावे ।।**
**आन धर्म सो शुद्र ।। ओर सिखे सीखावे ।।२३।।**

जीवांना बहकावून नरकीय कर्मात घेऊन जातो,तो नीच आहे,अन्य धर्म(रामजी शिवाय दुसरे धर्म),स्व:ता शिकतो आणि दुसऱ्यांना शिकवतो ते नीच आहेत. ।।२३।।

अमर पद की बात ।। शुद्र के मना न भावे ।।
प्रम भक्त बिन मुक्त ।। शुद्र सो नरका जावे ।।२४।।

ज्याच्या मनाला अमर पदाची गोष्ट आवडत नाही,चांगली नाही लागत ते नीच आहे,जो परम भक्ती करुन करुन मुक्तीला न जाता नर्कामध्ये जातो तो नीच आहे. ।।२४।।

भगत बिना सब शुद्र ।। शुद्र जमद्वारे जावे ।।
किया कर्म मन शुद्र ।। धरम सो मार दिरावे ।।२५।।

भक्तीशिवाय हे सर्वही यमाचा द्वारावर जातात मनाचा प्रमाणाने नीच कार्य करतात, त्यांना धर्मराज मार देईल.।।२५।।

भगत बिना नहि मुगत ।। शुद्र सो जनम धरावे ।।
गर्भवास के मांय ।। शुद्र मळ मुत्तर खावे ।।२६।।

भक्तीचा शिवाय मुक्ती होणार नाही,त्यांना परत जन्म घ्यावा लागेल,असे परत जन्म घेणारे नीच आहे.परत गर्भवासात यावे लागले आणि तेथे गर्भवासात मळ मुत्र खावे लागले ते नीच आहे.।।२६।।

अरद मुख नव मास ।। शुद्र सो संकट पावे ।।
बिन भगती सो शुद्र ।। गर्भ मे ज्यां त्यां जावे ।।२७।।

गर्भात खाली तोंड आणि वरती पाय अशा प्रकारे संकट भोगावे लागते ते नीच आहे, भक्ती करण्याचा शिवाय सर्वच नीच आहेत,भक्ती न केल्याने चौऱ्यांशी लक्ष गर्भात जावे लागते, असे नेहमी नेहमी गर्भात जाणारा नीच आहे. ।।२७।।

गर्भवास नव मास ।। शुद्र सो बासा लीया ।।
मळ मुत्तर को आहार ।। शुद्र ले निस दिन कीया ।।२८।।

जे गर्भवासात नऊ महीने राहीले होते,ते नीच आहे.गर्भात मळ मुत्राचे भोजन रात्रंदिवस करीत होते ते नीच आहे.।।२८।।

परनारी रत्त शुद्र ।। शुद्र वेस्या संग कर हे ।।
बोहो दिन धाडे काम ।। द्रव्य ले दण्ड मे भरे हे ।।२९।।

जो दुसऱ्या नारीसी रती क्रिया करतो तो नीच आहे.जो वेश्येचा साथ करतो तो नीच आहे,खुप दिवसापर्यंत डाका टाकण्याचे काम करीत राहतो तो नीच आहे.तसेच डाका टाकून दुसऱ्याचे धन लुटून आणून दंड भरतो तो नीच आहे, ।।२९।।

मात गर्भ नव मास ।। शुद्र सो संकट देखे ।।
दु:खी सासा होय जाय ।। मास नव अबखा लेखे ।।३०।।

जो मातेच्या गर्भात नऊ महीन्या पर्यंत संकट भोगतो तो नीच आहे.त्याला(नऊ महीने) गर्भात श्वास येत नाही या करीता दु:खी राहतो,तो नीच आहे.।।३०।।

साखी ।।

जनम समे सब शुद्र था ।। सब लोई संसार ।।
सुखराम दास करणी किया ।। ऊँच नीच बोहार ।।३१।।

जन्म घेते वेळी संसाराचे सर्वही लोक नीचच राहतात,जन्म घेतल्यावर उच्च कर्म केल्याने उच्च होतात तसेच नीच कर्म केल्याने नीच होतात,तर जन्म घेतल्यानंतर करणीच्या व्यवहाराचा प्रमाणानुसार उच्च आणि नीच होतो,परंतु(जन्म घेते वेळी सर्वही नीच असतात),असे आदि सतगुरू सुखरामजी महाराज बोलले. ।।३१।।

आ मै कही बिचार के ।। बुरो न मानो कोय ।।
मळ मुत्तर का संग सुं ।। सबे शुद्रज्युँ होय ।।३२।।

ही गोष्ट मी विचारपुर्वक(विचार करून)सांगीतली आहे,यात कोणी वाईट नका मानू, मळ राहिल्याने,सर्वही नीच जाती सारखे असतात. ।।३२।।

राम भजे सो ब्रम्ह हे ।। करणी करे सो देव ।।
सुखराम न्याव सुं बोलियां ।। सुणो सकळ सब भेव ।।३३।।

जो राम भजन करतो तो सतस्वरुप ब्रम्ह आहे.जे चांगले कर्म करतात ते देव आहेत, राम भजन करणारा सतस्वरुप ब्रम्ह होऊन जातो.आदि सतगुरू सुखरामजी महाराज न्यायाने सांगीतले आहे,तो भेद सर्वही ऐका. ।।३३।।

राम बिना सब नीच हे ।। तिण मे फेर न सार ।।
ब्यास कहे सुखरामजी ।। हरि बिन सबे चमार ।।३४।।

राम भजनाशिवाय सर्वही नीच आहे,यांच्यात काही शंका नाही,वेद व्यासाने सांगितले आहे की,हरचा(रामजी)भक्ती शिवाय सर्व नीच आहे. ।।३४।।

बाण खाण चारो सही ।। अेक आत्मा होय ।।
जन सुखिया जळ एक हे ।। फेर फार नहिं कोय ।।३५।।

चार वाणी(परा,पश्यंती,मध्यमा आणि वैखरी),चार खाणी(अंडज,जारज,अंकुर आणि स्वेदज)अंडज म्हणजे अंड्यापासून उत्पन्न,जसे–पक्षी,सर्प इ.जारज–म्हणजे जाळपासून उत्पन्न,जसे–मनुष्य,पशू,गाय,म्हशी इ.अंकुर म्हणजे ज्याचे कोंब निघतात,असे वृक्ष इ. आणि उद्‌भीज–स्वेदज उवा इ.)आपले आपण घामाचा मळाने उत्पन्न झालेले या सर्वामध्ये एकच आत्मा आहे,जसे पाणी कोठलेही राहीले,तरी सर्व पाणी एकच आहे, पाण्यात अंतर नाही,त्याच प्रकारे सर्वात आत्मा एकच आहे. ।।३५।।

बाँभी को चेलो तको ।। मकर चलावे जोय ।।
रीस बाद सुखराम के ।। बोहो निन्दा घट होय ।।३६।।

जो व्यास मकर फैल फितुर रचतो,तो नीच गुरुचा शिष्य होतो.ज्याच्या घटात क्रोध आणि

वाद विवाद करणारा स्वभाव खुप आहे तो नीच गुरुचा शिष्य आहे.लोकांची खुपच निंदा करतो,तो नीच गुरुचा शिष्य आहे,असे आदि सतगुरू सुखरामजी महाराज बोलले. ।।३६।।

बाँभी को चेलो तको ।। ब्रम्ह बिचारे नाहिं ।।
मैं ते मुख सुखराम के ।। आपे चड बिष खाय ।।३७।।

जो ब्रम्हचा विचार करीत नाही.ज्याच्या मुखात मी आणि तू मी आणि तू असा अहंकार आहे व विषय रस खातो,तो नीच गुरुचा शिष्य आहे,असे आदि सतगुरू सुखरामजी महाराज बोलले. ।।३७।।

बाँभी को चेलो तको ।। तां घट भ्रम अनेक ।।
आछो खावण वास्ते ।। मकर चलावे देख ।।३८।।

ज्याच्या घटात अनेक भ्रम आहे आणि जो चांगले चांगले खाण्याकरीता ढोंग करतो,तो नीच गुरुचा चेला आहे.।।३८।।

बाँभी को चेलो तको ।। भजे न सिरझण हार ।।
कुल छाडे सुखराम के ।। बोहो पाखण्ड ले धार ।।३९।।

जो शिरजणहार(पैदा करणाऱ्याचा)रामजीचे भजन करीत नाही आणि कुळ परीवार सोडून अनेक पाखंड धारण करून घेतो,तो नीच गुरुचा चेला आहे. ।।३९।।

बाँभी को चेलो तको ।। भगत भेद बिन होय ।।
घर घर का सुखराम के ।। खावे टुकडा जोय ।।४०।।

भेदाशिवाय भक्त बनून बसतो आणि भक्त बनून घरा घरातील तुकडा मागून खात फिरतो,तो नीच गुरुचा चेला आहे. ।।४०।।

बाँभी को चेलो तको ।। निरस बेण मुख माय ।।
समरथ साहिब छाड कर ।। मोगा पूजे जाय ।।४१।।

ज्याच्या मुखातून हलके वचन निघतात.समर्थ साहेबाला सोडून मोगा(भूत,प्रेत,बीर, बीराटी,वेताळ,थड्गो,पीर)इत्यादीला पुजायला जातो,तो नीच गुरुचा चेला आहे. ।।४१।।

बाँभी को चेलो तको ।। सिकळ विकळ नर होय ।।
ब्रम्ह भेद सुखराम के ।। तत्त नहिं चीने कोय ।।४२।।

जे मनुष्य सतस्वरुप ब्रम्हचा भेद ओळखत नाही,ते नीच गुरुचा चेला आहेत,जे मनुष्य कधी ह्या धर्मात जातात,तर कधी या पंथात येतात,कधी तो त्या देवाची पूजा करतात, तर कधी या देवाची,(म्हसोबा,बहीरोबा,ईसाई,मेस्काई इ.पुजत राहतो),तो शुद्र गुरुचा चेला आहे.असे आदि सतगुरू सुखरामजी महाराज बोलले. ।।४२।।

दुर्वासा क्या सेवियो ।। तां का सिष अवतार ।।

सुणज्यो सब सुखराम के ।। समझर करो बिचार ।।४३।।

दुर्वासाने कोणत्या प्रकारची भक्ति केली,तर त्यांचा चेला कृष्ण झाला,हे सर्व ऐका आणि समजून विचार करा.असे आदि सतगुरू सुखरामजी महाराज बोलले. ।।४३।।

वशिष्ट मुनि क्या सेवियो ।। क्या सिंवऱ्यो को मोय ।।
ता के सिष सुखराम के ।। रामचंदसा होय ।।४४।।

वशिष्ठ मुनींनी कोणाची सेवा केली आणि कोणत्या प्रकारचे स्मरण केले की,त्या वशिष्ठाचा रामचंद्र सारखा शिष्य झाला.हे मला विचार करुन सांगा.असे आदि सतगुरू सुखरामजी महाराज बोलले.।।४४।।

सोरठा ।।

हरि बिन हिण चमार ।। तुलछी चोडे के गया ।।
सुखदेव कियो बिचार ।। सप्त धात को पींजरो ।।४५।।

हर(रामजीचा)शिवाय सर्वही नीच आहे,असे तुलसीदासाने प्रगट रुपात सांगीतले. सुखदेवाने सर्व जातीचा मनुष्यांचा देह पिंजला.रस,रूधीर,मांस,मेद,मज्जा,हाडे तसेच रेत या सात धातूचा आहे हे सांगीतले,तर कोणी उच्च आणि नीच कसे झाले हे सांगा. असे आदि सतगुरू सुखरामजी महाराज बोलले. ।।४५।।

पाँच पचीसु मांय ।। जन सुखदेव असे कहे ।।
या बिन न्यारी देह बताय ।। चार बरण देह एक हे ।।४६।।

सर्वा मध्ये म्हणजे उच्च जाती मध्ये आणि नीच जातीत पाच इंद्रियांचे पाच विषय आणि पंचवीस प्रकृती राहतात.यांच्याशिवाय कोणाचा वेगळा देह आहे का,तर तो मला दाखवा,चारी वर्णाचा देह एक सारखाच असतो.वेग वेगळा नसतो.असे आदि सतगुरू सुखरामजी महाराज बोलले. ।।४६।।

नख चख सकळ स्वरूप ।। रूइ बण्या कपास मे ।।
ऊत्तम कूण सब सूत ।। धरणी ब्रम्हण्ड तेज जळ ।।४७।।

सर्वाचे नख आणि डोळे एक सारखे आहेत व स्वरूपही एक सारखेच आहेत,नीच जातीचे साडे तीन हात उंच आहे,तर उच्च जातीचे अठ्ठावीस हात उंच काही दिसत नाही.रंग ब्राम्हणाचा सफेद,क्षत्रियचा लाल,वैश्यचा पिवळा,शुद्रचा काळा हे काही वेग वेगळे नसतात,सर्व वर्णात चारी रंगाचे मनुष्य दिसतात,शुद्राचे दोन डोळे असतात,तर उच्च जातीचे चार डोळे नसतात,असेच शींग व शेपुट ही उच्च आणि नीच नसते,जसे कापसात रूई आणि सरकी राहते,तसेच सर्व एक आहे,आता या एका कापसाच्या सुतला उत्तम आणि मध्यम असे कसे समजणार,अशा प्रकारे आकाश,वायू,अग्नी,जळ, पृथ्वी या पाची पासून बनलेल्या मनुष्याला,उत्तम आणि मध्यम कसे समजणार.।।४७।।

पवन सकळ मे होय ।। सुखराम कहे इण पाँच मे ।।
मिधम कहे सो कोय ।। कुवो बेरी बावडी ।।४८।।

या सर्व पाची तत्वाच्या चारी वर्णाच्या आत एकच श्वास आहे,तर आता कोणाला नीच दाखवणार,असे आदि सतगुरू सुखरामजी महाराजांनी विचारले.जसे वेग वेगळ्या प्रकारचा विहीरीचे पाणी,तलावाचे पाणी आणि नदीचे पाणी तहाण मिटवण्या करीता एकच आहे. त्याला हलके,भारी कसे म्हणणार.असे आदि सतगुरू सुखरामजी महाराज बोलले.।।४८।।

सरवर नदियाँ होय ।। जन सुखिया जळ खाबडे ।।
उत्तम किस्यो को होय ।। मेला कूं निरमळ करे ।।४९।।

तलावाचे,नदीचे आणि खाबडा म्हणजे डोहाचे पाणी,या पाण्यामध्ये उत्तम कोणते असते,ते मला सांगा,सर्व पाणी मळाला निर्मळ करते.असे आदि सतगुरू सुखरामजी महाराज बोलले. ।।४९।। ।। इति हीण लछ को अंग संपूरण ।।